माहे ऑक्टोंबर,२०१९ चे माहे नोव्हेंबर,२०१९
देय होणारे वेतन/ निवृत्तीवेतन दिवाळीपूर्वी
करणेबाबत....

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
अर्थ प्रशासन विभाग
पी.ओ. कृषि नगर, अकोला -४४४ १०४ (महाराष्ट्र)

जा.क्र.अप्रवि/ अंदाज/२०७१ /२०१९ दिनांकः १६/१०/२०१९

वाचाः १) शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २०१९/प्र.क्र.१५३/कोषा-प्रशा५,दिनांक ०९/१०/२०१९.
२) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.संलेको-२०१९/कोष/सलेअ-२ /दिवाळी वेतन/निवृत्तीवेतन/२०१९/२८४,दिनांक ११/१०/२०१९.
३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. अप्रवि/अंदाज/२००१/२०१९, दि.०९/१०/२०१९.
४) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. अप्रवि/अंदाज/२०४३/२०१९, दि.१४/१०/२०१९.
५) शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २०१९/प्र.क्र.१५३/कोषा-प्रशा५,दिनांक १५/१०/२०१९.

## परिपत्रक

दिवाळी सणाची सुरुवात यावर्षी दि.२५ ऑक्टोंबर,२०१९ पासून होत आहे त्यामुळे माहे ऑक्टोंबर,२०१९ चे माहे नोव्हेंबर,२०१९ देय होणारे वेतन/ निवृत्तीवेतन दिनांक २४ ऑक्टोंबर, २०१९ पूर्वी प्रदान करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे व त्या अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भ क्र.३ चे परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते.

परंतु, संदर्भ क्र. २ चे पत्र व संदर्भ क्र.४ च्या परिपत्रकान्वये माहे ऑक्टोंबर,२०१९ चे माहे नोव्हेंबर,२०१९ देय होणारे वेतन/निवृत्तीवेतन दिवाळीपूर्वी करणेबाबत तूर्तास स्थगिती करण्यात आली होती.

आता पुन्हा संदर्भ क्र. ५ अन्वये कोषागारांतील कर्मचाऱ्यांच्या सेवा मोठया प्रमाणात निवडणूक कामासाठी अधिग्रहित करण्यात आल्याची वस्तुस्थिती विचारात घेता उपलब्ध मनुष्यबळाचा पर्याप्त वापर करुन वेतन / निवृत्तीवेतन देयके दि. २५ ऑक्टोंबर, २०१९ पूर्वी पारित करण्याचा प्रयत्न करण्याबाबत शासनाने परिपत्रक निर्गमित केले आहे.

त्या अनुषंगाने विद्यापीठातील सर्व विभागप्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की त्यांनी उपरोक्त शासन परिपत्रकान्वये कार्यवाही करुन , त्यांच्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन दिनांक २५ ऑक्टोंबर, २०१९ पूर्वी संबंधीत अधिकारी /कर्मचारी यांचे खात्यात जमा होईल या बेताने सेवार्थ प्रणालीत देयके सादर करुन वेतन व लेखाधिकारी यांच्या मार्फत देयके पारीत करुन घेण्यात यावीत.

16/10/19
नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

प्रत :१) सर्व विभागप्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी, डॉ.पं दे.कृ.वि., अकोला / नागपूर यांना योग्य कार्यवाहीस्तव.
२) मा.कुलगुरु महोदय यांचे स्वीय सहायक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना मा.कुलगुरु महोदय यांचे माहितीस्तव.
३) कुलसचिव, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला यांना माहितीस्तव.
४) वेतन व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला/ नागपूर यांना उचित कार्यवाहीस्तव.
५) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारणाकरीता.

नियंत्रक